ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २८१ • गुरुवार दि.६ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## शिवसेनेची घटना फेटाळण्याचा अधिकार आयोगाला कोणी दिला?

### कपिल सिब्बल यांचा न्यायालयात घणाघाती युक्तीवाद; पुढच्या आठवड्यात पुन्हा सुनावणी



नवी दिल्ली-शिवसेनेची २०१८ मधील अधिकृत घटना निवडणूक आयोगाने कोणत्या अधिकाराने अमान्य केली? असा थेट सवाल उपस्थित करत आयोगाने आपल्या अधिकारक्षेत्राची मर्यादा ओलांडल्याचा गंभीर आरोप ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी आज सर्वोच्च न्यायालयात केला.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरील वादाच्या सुनावणीत गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयांवर जोरदार प्रहार केला. सिब्बल यांनी न्यायालयाला सांगितले की, एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारले तेव्हा शिवसेनेची अधिकृत घटना अस्तित्वात होती. त्याच घटनेच्या आधारे निवडून आलेले आणि मंत्री झालेल्या आमदारांनी नंतर तीच घटना फेटाळून स्वतःला खरी शिवसेना म्हणणे हा घटनात्मक विसंगतीचा कळस असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. विधिमंडळ पक्षात फूट पडली म्हणजे राजकीय पक्षात फूट पडली, असा निष्कर्ष कसा काढता येईल? असा सवाल करत सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयावर थेट बोट ठेवले. पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील १६० हून अधिक पदाधिकारी उद्धव ठाकरे यांच्या बाजूने होते. फूट संघटनेत नव्हे, तर केवळ विधिमंडळ पक्षात पडली होती. तरीही आयोगाने आमदारांच्या संख्येच्या आधारावर पक्षाचा ताबा आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला देणे हा कायद्याचा चुकीचा अर्थ लावल्याचा आरोप त्यांनी केला. सत्तेच्या जोरावरच शिंदे गटाचे संख्याबळ वाढल्याचा दावा करत सिब्बल म्हणाले, सुरुवातीला १६ आमदार असलेला गट मुख्यमंत्रीपद मिळाल्यानंतर ३१, त्यानंतर ३९ आणि अखेरीस ५६ आमदारांपर्यंत पोहोचला. त्यानंतर खासदारही त्यांच्यासोबत गेले. हे बहुमत विचारसरणीचे नव्हे, तर सत्तेच्या चुंबकीय आकर्षणाचे होते, असा टोला त्यांनी लगावला. निवडणूक आयोगाने अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय होण्यापूर्वीच पक्षचिन्हाचा निकाल दिला आणि त्याच निर्णयाच्या आधारावर पुढील सर्व राजकीय घडामोडींना दिशा मिळाली,

### जरांगे पाटलांचा मुख्यमंत्र्यांसह शिंदेंनाही कडक इशारा

## सरकारचा मराठ्यांविरोधात मोठा कट

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी- मराठवाड्यातील चार मराठा महिला लोकप्रतिनिधींची कुणबी जात वैधता प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीने रद्द केल्यानंतर मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर थेट हल्लाबोल करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोपांची सरबत्ती केली.



मराठ्यांचे पानिपत करण्यासाठी सरकारने नियोजनबद्ध कट रचला असून, २०२९ मध्ये याची मोठी राजकीय किंमत मोजावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला. तीन वर्षांत प्रथमच एकनाथ शिंदे यांच्यावर थेट टीका करत जरांगे पाटील म्हणाले, प्रमाणपत्रे सरकारनेच द्यायची आणि सरकारनेच रद्द करायची, हा मराठा समाज संपविण्याचा डाव आहे. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा कट सुरू आहे. मराठ्यांचे कसे वाटोळे केले जात आहे, हे मी राज्यासमोर उघड करणार आहे. सरकारने मराठा समाजाशी विश्वासघात केल्याचा आरोप करत त्यांनी सत्ताधाऱ्यांना थेट निवडणुकीचा इशारा दिला. २०२९ मध्ये एवढा मोठा बदला घेऊ की, युतीचे लोक कांड्यावर मोजण्याइतकेही निवडून येणार नाहीत. मराठा समाजाची ताकद दाखवून देऊ, असे ते **पान ४ वर**



(छाया : करणसिंह बैस)

नांदेड शहरातील मामा गॅरेजच्या पाठीमागील कृष्णा चौकाजवळ रस्त्याचा मधला भाग खचल्याने खड्डा पडला असून रेती वाहतूक करणारा ट्रक या खड्ड्यात आज (गुरुवार) सकाळी अडकला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## डॉक्टरांचा संप,राज्यातील रुग्णसेवा ठप्प

### उच्च न्यायालयाकडून फटकारे;तात्काळ काम सुरु करण्याचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी- होमिओपॅथी (बीएचएमएस) पदवीधरांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत (एमएमसी) सशर्त नोंदणी देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात राज्यभरातील निवासी डॉक्टरांनी बेमुदत संप पुकारला आहे. या आंदोलनाचा फटका नांदेडसह राज्यातील सरकारी वैद्यकीय महाविद्यालये आणि जिल्हा रुग्णालयांना बसला असून, बाह्यरुग्ण विभागाच्या (ओपीडी) सेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाल्या आहेत. आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग (आयसीयू) आणि नियोजित शस्त्रक्रिया सुरू असल्या तरी नियमित उपचारांसाठी आलेल्या शेकडो रुग्णांची गैरसोय झाली.


दरम्यान रुग्णांना वेठीस धरण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? काम करत नसाल तर पगार घेण्याचाही अधिकार नाही. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीनंतर तात्काळ कामावर रुजू व्हा, अशा कठोर शब्दांत न्यायालयाने संपकरी डॉक्टरांना फटकारत संप त्वरित मागे घेण्याचे आदेश दिले. राज्यातील सुमारे सात हजार निवासी डॉक्टर संपात सहभागी झाले असून इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), सेंट्रल मार्ड, बीएमसी मार्ड, महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटना, महाराष्ट्र स्टेट मेडिकल टीचर्स असोसिएशन आणि महाराष्ट्र सिनियर रेसिडेंट डॉक्टर असोसिएशन यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे मुंबई, नांदेडसह राज्यातील शासकीय व खाजगी रुग्णालयांतीलरुग्णसेवा ठप्प झाली आहे. नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासह जिल्ह्यातील सरकारी व खाजगी आरोग्य व्यवस्थेवरही या आंदोलनाचे पडसाद उमटले आहेत. नियमित तपासणीसाठी आलेल्या रुग्णांना काही प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या गंभीर प्रकरणाची न्यायालयाने स्वतःहून दखल घेत इंडियन मेडिकल असोसिएशन **पान ४ वर**

## सीजेपी देशभर जनसंवाद साधणार-दिपके

### डिसेंबरपासून'क्या बोलती पब्लिक'अभियान

छत्रपती संभाजीनगर - कॉकरोच जनता पार्टी येत्या डिसेंबर महिन्यापासून 'क्या बोलती पब्लिक' या नावाने देशव्यापी जनसंवाद अभियान सुरू करणार असल्याची घोषणा पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केली. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या पक्षाच्या दोन दिवसीय बैठकीनंतर त्यांनी ही माहिती दिली.

दिपके यांनी सांगितले की,



या अभियानाअंतर्गत पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते देशभर दौरे करून नागरिकांच्या समस्या, अपेक्षा आणि अडचणी प्रत्यक्ष जाणून घेतील. शिक्षण, बेरोजगारी, संविधान, लोकशाही आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन प्रश्नांवर जनतेशी थेट संवाद साधण्यावर या अभियानाचा भर असेल. देशातील तरुण, विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि विविध घटकांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर मांडण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सध्याच्या राजकारणात **पान ४ वर**

## अबचल नगर ते यात्री निवास रस्त्याच्या निकृष्ट कामाची चौकशी करण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील गुरुद्वारा परिसरातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'अबचल नगर कमान ते यात्री निवास चौक' दरम्यानच्या रस्ता कामात गेल्या आठ ते दहा महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात दिरंगाई होत आहे. तसेच नव्याने टाकण्यात आलेली ड्रेनेज लाईन तुंबल्याने नागरिकांना व वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला स्मरणपत्र देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

या रस्त्यावर सचखंड पब्लिक स्कूल, दशमेश हॉस्पिटल, खालसा हायस्कूल यांसारख्या प्रमुख संस्था तसेच अबचल नगर कॉलनी, भगतसिंग रोड, बडपुरा, चिखलवाडी, शहीदपुरा या दाट लोकवस्तीच्या भागातील हजारो विद्यार्थी, रुग्ण आणि नागरिकांची दररोज मोठी रहदारी असते. पावसाळ्याचे दोन महिने उलटूनही कॅान्ट्राटदाराने काम पूर्ण केलेले नाही. रस्त्यावर ठिकठिकाणी दोन ते तीन फुटांचे खड्डे पडले असून त्यात दररोज वाहने अडकत आहेत. महानगरपालिका प्रशासनाचे या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत आणि निकृष्ट दर्जाच्या ड्रेनेज लाईन कामाची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी जगदीप सिंघ



नंबरदार, हरभजन सिंघ पुजारी, गुरुसेवक सिंघ कारागीर, गुरबच्चन सिंघ कारागीर, भाग सिंघ,बचन सिंघ सरदार यांच्यासह परिसरातील नागरिकांनी मागणी केली आहे.

## किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील ठेवी मधील अपहार,अनियमितता प्रकरणी सचिव दोषी

### तात्काळ निलंबित करण्याचे पणन संचालकांचे आदेश

किनवट/प्रतिनिधी- सोयाबीन खरेदीतील गंभीर अनियमितता, तब्बल २.५२ कोटी रुपयांच्या मुदत ठेवींची बेकायदेशीर उचल आणि दस्तऐवजांचा गैरवापरासह अन्य मुद्द्यांच्या चौकशीनंतर किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिवांना जबाबदार धरण्यात आले आहे. पणन संचालक शरद जरे यांनी ३ ऑगस्ट रोजी संचालक मंडळाला तात्काळ बैठक घेऊन सचिव रवींद्र राठोड यांना तात्काळ निलंबित करुन, त्यांच्याकडील आर्थिक व प्रशासकीय अधिकारी काढून घेण्याचे निर्देश दिले आहेत. संचालक मंडळाने निर्देशांचे पालन न केल्यास त्यांच्या विरुद्ध कायद्यातील तरतुदीनुसार प्रशासकीय कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीत २ कोटी ५२ लाख रुपयांच्या ठेवी मोडून अपहार केल्याचा आरोप उपसभापती राहुल गेमसिंग नाईक व इतर सदस्यांनी याप्रकरणी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार नोंदवली होती. तक्रारीनुसार, सचिव रवींद्र राठोड यांनी सन २०२५-२६ च्या कालावधीत शेतकऱ्यांचे सोयाबीन परस्पर विकणे, कार्यालयातील महत्त्वाची कागदपत्रे घरी नेऊन मनमानी वापर करणे आणि बाजार समितीच्या शुल्काची परस्पर उचल करणे यांसारखे गैरव्यवहार केले. तसेच, बाजार समितीच्या जमिनीच्या विक्रीतून मिळालेल्या निधीतून क्सिस बँकेतील १ कोटी ६० लाख रुपये आणि कॅनरा बँकेतील ९२ लाख ३६ हजार रुपये अशा एकूण रु. २ कोटी ५२ लाखांच्या मुदत ठेवी बेकायदेशीरपणे मोडून रकमेचा अपहार केल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला होता. त्यावरून जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था, नांदेड) आणि तालुकास्तरीय दक्षता पथकाने या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर केला होता. या अहवालात सोयाबीन खरेदी केंद्रावर नियमावलीचे उल्लंघन करून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिल्याचे स्पष्ट झाले आहे. याशिवाय, संचालक मंडळाच्या नियमित सभा न घेणे आणि सदस्यांना पूर्वसूचना न देणे यांसारख्या बाबींमधून सचिवाने कर्तव्यात अक्षम्य कसूर केल्याचे निष्पन्न झाले आहे.

चौकशी अहवालाची गंभीर दखल घेत, पणन संचालक शरद जरे यांनी 'महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री विकास व विनियमन अधिनियम १९६३' च्या कलम ४० ई मधील अधिकारांचा वापर करत हे आदेश जारी केले आहेत. नियम १०२ अंतर्गत सचिव रविंद्र राठोड यांच्या निलंबनाचा ठराव मंजूर करून त्यांचे सर्व प्रशासकीय व आर्थिक अधिकार तात्काळ काढून घेण्यात यावेत आणि त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करून अहवाल जिल्हा उपनिबंधकांकडे सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. आठ दिवसांत ही कारवाई न झाल्यास संचालक मंडळावरच बडगा उगारला जाणार असल्याने किनवटच्या राजकीय व सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. म्हणून उपसभापतींनी ८ ऑगस्ट रोजी तातडीची बैठक बोलावल्याचे समजते. यापुढे काय काय उलथापालथी होणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागून दिसते.

## जात पडताळणी समितीच्या निर्णयात सरकारचा हस्तक्षेप नाही-मुख्यमंत्री

मुंबई/प्रतिनिधी-कुणबी प्रमाणपत्रे रद्द झाल्याच्या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारची भूमिका स्पष्ट




करत जात पडताळणी समितीचे काम सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार चालते आणि त्यामध्ये सरकारचा कोणताही हस्तक्षेप नसल्याचे सांगितले. मनोज जरांगे पाटील यांच्या टीकेवर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले, समितीकडे येणाऱ्या विविध जात प्रमाणपत्रांपैकी १० ते १२ टक्के प्रकरणे नियमांनुसार फेटाळली जातात. त्यामुळे जाणीवपूर्वक कुणाचेही प्रमाणपत्र रद्द केले जात नाही. अन्याय झाल्याची भावना असल्यास संबंधितांना अपील करण्याची संधी उपलब्ध असून समितीने नमूद केलेल्या त्रुटींची पूर्तता करता येते. भाजपच्या लोकप्रतिनिधींचीही प्रमाणपत्रे रद्द झाल्याची उदाहरणे असल्याने या प्रक्रियेत कोणताही राजकीय हस्तक्षेप नसल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

## उपचार की प्रयोग?

**आरोग्य ही कोणत्याही समाजाची सर्वात मोठी संपत्ती आहे. त्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या डॉक्टरांच्या शिक्षणाच्या दर्जाशी किंवा उपचार पद्धतीशी संबंधित कोणताही निर्णय हा अत्यंत संवेदनशील असतो. महाराष्ट्र शासनाने होमिओपॅथी पदवीधरांना काही आधुनिक औषधोपचार करण्याचा अधिकार देण्याच्या निर्णयानंतर राज्यभर निर्माण झालेला वाद आणि त्याविरोधात डॉक्टरांनी पुकारलेले आंदोलन हे केवळ एका व्यावसायिक वर्गाचे आंदोलन म्हणून पाहता येणार नाही. हा प्रश्न थेट रुग्णांच्या सुरक्षिततेचा, वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेचा आणि देशातील आरोग्य व्यवस्थेवरील विश्वासाचा आहे. भारतात ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी अशा विविध वैद्यकीय शाखा अस्तित्वात आहेत. प्रत्येक शाखेचे तत्त्वज्ञान, अभ्यासक्रम, उपचारपद्धती आणि औषधांचा वापर वेगळा आहे. या सर्व शाखांनी आपापल्या पद्धतीने समाजाला सेवा दिली आहे. मात्र एका शाखेतील पदवीधराला दुसऱ्या शाखेतील उपचार करण्याचा अधिकार देण्याचा निर्णय घेतला जातो, तेव्हा त्यामागील वैज्ञानिक आधार, प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि रुग्णांच्या सुरक्षिततेचा विचार सर्वाधिक महत्त्वाचा ठरतो. केवळ अल्पकालीन प्रशिक्षणाच्या आधारे आधुनिक वैद्यकीय उपचारांची जबाबदारी देणे कितपत योग्य, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनसह अनेक डॉक्टर संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यांच्या आंदोलनामागे केवळ व्यावसायिक स्पर्धा आहे, असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून ठरणार नाही. आधुनिक वैद्यकशास्त्रातील शिक्षण हे साडेपाच वर्षांचा अभ्यासक्रम, त्यानंतरची इंटर्नशिप, प्रत्यक्ष रुग्णसेवा, सतत अद्ययावत होणारे संशोधन आणि तांत्रिक कौशल्य यांवर आधारित असते. त्यामुळे या शिक्षणाच्या समतुल्य प्रशिक्षणाशिवाय आधुनिक उपचारांचा अधिकार देणे म्हणजे वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जालाच धक्का देण्यासारखे असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. दुसरीकडे शासनाची भूमिकाही समजून घेण्यासारखी आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागात डॉक्टरांची तीव्र कमतरता आहे. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरांची पदे वर्षानुवर्षे रिक्त आहेत. दुर्गम भागातील नागरिकांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करून आरोग्यसेवा वाढविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. परंतु डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी शिक्षणाच्या निकषांमध्ये तडजोड करणे हा दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही. ही समस्या भरती प्रक्रिया गतिमान करून, ग्रामीण सेवेसाठी प्रोत्साहन देऊन, आधुनिक सुविधा उपलब्ध करून आणि वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार करूनच सोडवावी लागेल. याहूनही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रुग्णांचा विश्वास. रुग्ण उपचारासाठी डॉक्टरांकडे जातो तेव्हा त्याला त्या डॉक्टरच्या शिक्षणावर, कौशल्यावर आणि अनुभवावर पूर्ण विश्वास असतो. चुकीचे निदान किंवा औषधोपचारातील त्रुटी याची किंमत अनेकदा रुग्णाला जीव गमावून मोजावी लागू शकते. त्यामुळे आरोग्य क्षेत्रात कोणताही निर्णय घेताना रुग्णहित हेच सर्वोच्च निकष असले पाहिजेत. उपचारातील गुणवत्ता आणि सुरक्षितता याबाबत कोणतीही तडजोड स्वीकारता येणार नाही. या वादामुळे आणखी एक वास्तव समोर आले आहे. देशात डॉक्टरांची संख्या वाढली असली, तरी त्यांचे समान वितरण झालेले नाही. महानगरांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची संख्या मोठी आहे, तर ग्रामीण भागात मूलभूत आरोग्यसेवाच अपुरी आहे. ही दरी भरून काढण्यासाठी सरकारने प्रभावी धोरण आखणे आवश्यक आहे. वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढविण्याबरोबरच दर्जेदार शिक्षण, प्रशिक्षित प्राध्यापक, सुसज्ज रुग्णालये आणि संशोधनाला चालना देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सरकार, डॉक्टर संघटना आणि संबंधित वैद्यकीय परिषदा यांनी संघर्षाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारला पाहिजे. कोणताही निर्णय हा वैज्ञानिक पुरावे, तज्ज्ञांचे मत आणि रुग्णांच्या हिताच्या कसोटीवर तपासला गेला पाहिजे. आरोग्य व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे ही काळाची गरज आहे; परंतु त्या सुधारणा वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा कमी करून किंवा रुग्णांच्या सुरक्षिततेशी तडजोड करून होऊ नयेत. कारण कोणत्याही सुसंस्कृत समाजात आरोग्यसेवा ही प्रयोगशाळा नसते, तर ती विश्वासाची आणि जबाबदारीची व्यवस्था असते. सरकारनेही हा विश्वास अबाधित ठेवणारे निर्णय घ्यावेत आणि डॉक्टरांनीही आंदोलनासोबत संवादाचे दरवाजे खुले ठेवावेत. समाजाला संघर्ष नव्हे, तर सक्षम, सुरक्षित आणि विश्वासार्ह आरोग्य व्यवस्था हवी आहे.**

# नकोय पुरस्कार



**अंकुश शिंगाडे**
नागपूर

राहल एक शिक्षक होता. तसा तो लेखकही. जो नियमीत लेख लिहायचा व त्याचे भरपूर लेख रोजच वर्तमानपत्रातून झळकायचे. त्यानं असे बरेच लेख लिहिले होते वर्तमानपत्रातून. ज्यातून त्यानं कितीतरी लोकांवर होत असलेल्या अन्यायावर वाचा फोडलेली होती. परंतु अद्यापही त्याला कोणतेच पुरस्कार नव्हते. ना त्यानथ आतापर्यंत कोणत्याच पुरस्कारासाठी अर्ज केला होता.

आदर्श शिक्षक पुरस्कार... एकदा त्यानं वर्तमानपत्रातून आदर्श शिक्षक पुरस्काराची बातमी वाचली. त्या वर्तमानपत्रात एक लिंक आली होती. जी भरायची होती व त्यानुसार प्रस्ताव मागविण्यात आले होते. जे तयार करुन आदर्श शिक्षक पुरस्कार मिळवायचा होता. त्यातच अशा आदर्श शिक्षक पुरस्काराची लिंक राहूलनंही भरली. वाटलं की इतर लोकँ काही विशेष नसूनही आदर्श शिक्षक पुरस्कार उचलतात. आपण का नाही मिळवू शकत आदर्श शिक्षक पुरस्कार. अशातच त्याला त्याबद्दल आदर्श शिक्षक पुरस्काराच्या मुलाखतीला बोलावले व त्यानुसार तो मुलाखतीला गेला.राहूल आज गरीब नव्हता. तो आदर्श शिक्षक पुरस्काराच्या लायक होता. तो हुशारच होता व त्याचं कार्यही आदर्श शिक्षक पुरस्काराला लागणाऱ्या दस्तऐवजापेक्षा मोठे होते. त्याचे दररोजच अन्यायावर वाचा फोडणारे लेख वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होत होते. ज्या लेखांची संपादक महोदय निवड करुन रोजच आपल्या वर्तमानपत्रात छापत होते. तोच छापून येणारा लेख त्याच्यासाठी पुरस्कार होता आणि संपादक महोदय त्याला तसा पुरस्कार देणारे आयोजनकर्ते. कारण संपादक महोदयांनी पत्रकारीतेत हयात घालविलेली असायची. ज्या हयातीमध्ये अनेक लेखकांच्या लेखनीचा अभ्यास त्यांनी केला होता.

राहूल ठरल्याप्रमाणे आदर्श शिक्षकाच्या पुरस्काराच्या मुलाखतीला गेला. त्यानं पाहिलं की तो आदर्श शिक्षक पुरस्कार. अनेक शिक्षक रांगेत होते. सर्वजण आपली मुलाखत देत होते. त्यांच्यासाठी वेगवेगळे प्रश्न होते. ज्या प्रश्नांची उत्तरं ते देत होते. त्याच रांगेत राहूलही होता. शिवाय बऱ्याच जणांनी प्रस्ताव तयार करुन आणले होते. ज्या प्रस्तावाचं रेखीवपण काळजाला भिडणारं होतं. ते प्रस्ताव पाहूनच वाटत होतं की त्यांनाच कदाचित पुरस्कार मिळेल. एवढं प्रस्तावाचं देखणेपण. मात्र त्या प्रस्तावाच्या सुबकतेच्या रांगेत राहूल नव्हताच. राहूल त्याबद्दल विचार करीत होता. तोच त्याचं कुणीतरी नाव उच्चारलं, राहूल आलेत काय? मॅडमनं बोलवलंय. राहूल विचारच करीत होता. तोच त्याच्या कानावर राहूल आलेत का. मॅडमनं बोलावलंय. हे कानावर पडताच राहूल भानावर आला व तो मुलाखतीसाठी मॅडमसमोर गेला. तसं मॅडमनं त्याला पाहिलं. त्याचा अस्ताव्यस्तपणा अनुभवला. ती साधी राहणी अनुभवली. त्यातच त्याला पाहून तो शिक्षक असेल, असंही जाणवत नव्हतं. तसा त्याला पहिला प्रश्न विचारल्या गेला. किती शिकलेत?

पहिला प्रश्न. किती शिकलेत. राहूल थोडा गोंधळलाच. त्याचं कारण नेमकँ उत्तर सांगायचं कोणतं. बारावी डी एड की पुढील अर्हता. राहूल गोंधळून गेला. तसा तो एम ए शिकलेला होता. ज्याचे काही गुण वाढणार होते. परंतु गोंधळलेल्या अवस्थेत लागलीच उत्तर आलं. बारावी शिकलो जी.जी...राहूलनं जी म्हटलं. तशा आयोजक मॅडम आणखी विस्मयानं राहूलकडे पाहात राहिल्या. विचार करीत होत्या की जी म्हणणं अडाणी भाषा. जी एका शिक्षकाला शोभत नाही. तरीही त्यानं आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज केलाय. राहूल एक साधारण व्यक्ती. गरीब घरचा. त्यानं गरीबी अगदी जवळून पाहिली होती. तीच शोषली होती. मात्र आज तो शिक्षक बनल्यानं व त्याची गरीबी संपल्यानं व त्याला भरपूर वेतन मिळत असल्यानं त्याची गरीबी संपली होती. परंतु नोकरी लागण्यापुर्वी गरीबी शोषल्यानं त्याचं वागणं बदललेलं नव्हतं. नाही त्याची भाषा बदललेली होती. राहूलकडं पाहात आयोजक मॅडम विस्मयचकित नजरेनं स्तब्ध होत्या. त्यांना कळलं होतं की राहूल बारावीच शिकलेला असेल. तो काही जास्त शिकलेला नाही. म्हणूनच त्याचं स्तब्धपण. राहूल कसाबसा गरीबीवर मात करीत एका खाजगी शाळेत नोकरीवर लागला. ज्या शाळेत त्याच्या कलागुणांना वाव नव्हताच. त्यातच त्या शाळेत असलेले गोपनीय अहवाल ना त्यांना कळवत असत. ना त्यांना त्याच्या सांक्षांत्कित प्रती देत असत. अशातच राहूलचे गोपनीयचेही गुण कमी झाले. जेव्हा तोही प्रश्न त्याला विचारल्या गेला. मग आले इतर प्रश्न. अशा प्रश्नांच्या वेळेस उत्तर देतांना राहूलची तारांबळ उडाली. उत्तरादरम्यान क्षणभर डोक्यात विचार आला की जर मला आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला तर मला आदर्शपणातच जीवन घालवावं लागेल. यंत्रणेला जे हवं तेच लिहावं लागेल. यंत्रणेच्या विरोधात जावून लेख लिहिताच येणार नाही. मग कुणावर जरी अन्याय झाला तरी त्यावर वाचाही फोडण्यासाठी लिहिता येणार नाही.तो राहूलच्या मनातील विचार. नकोय पुरस्कार, अन ते आदर्शपणही नको. जे आदर्शपण कुणावर होत असलेला अन्याय मुकाट्यानं सहन करायला लावतंय. तसा विचार येताच त्यानं ओबडधोबड कशीतरी उत्तरं दिली व शेवटी जड अंतःकरणानं त्यानं आयोजक मॅडमला सांगीतलं की मॅडम नकोय मला असा पुरस्कार. आपण सर्व प्रश्नात मला शुन्यच गुण टाकावे.मुलाखत संपली होती. तो मुलाखतीतून बाहेर पडला. पुन्हा त्या मुलाखतीस न येण्याचा व लिंक न भरण्याचा विचार करीत. कारण ती मुलाखत व ते आदर्शपण त्याच्या वास्तववादी जगण्यावर कुठंतरी अडथळा निर्माण करणारे होते. आज राहूल नियत वयोमानानुसार म्हातारा झाला होता व नियत वयोमानानुसार तो निवृत्तही. आज राहूलला पुरस्कार नव्हता. परंतु तो आनंदीत होता. कारण त्यानं कितीतरी लोकांना आज आपल्या लेखनीच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला होता. त्यानं विद्यार्थ्यांसाठीही कार्य केले होते. त्यांनी स्वतः आत्मनिर्भर व्हावं म्हणून. परंतु त्यानं तसं करीत असतांना कधीच आपल्या कार्याचा गाजावाजा वा देखावा केला नव्हता. अगदी आज निवृत्त होईपर्यंत त्याचं राहाणं साधं होतं. मात्र विचार उत्कृष्ट दर्जाचे होते. जे त्याच्यातील माणूसकी असलेल्या माणूसपणाचे द्योतच होते. ज्यातून आज त्याला माणूसकी जपण्याचं सामर्थ्य प्राप्त झालं होतं.

# मराठी भाषा संवर्धनासाठी जिल्हा मराठी भाषा विकास केंद्र स्थापन केले जाणार-ना.उदय सामंत

नांदेड/प्रतिनिधी-मराठी भाषेचे संवर्धन, जतन, विकास आणि प्रसारासाठी शासन विविध उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हा मराठी भाषा विकास केंद्र स्थापन करण्यात येणार असून, या केंद्रामार्फत मराठी भाषेच्या संवर्धनाशी संबंधित विविध उपक्रमांचे नियोजन, समन्वय, नियमन आणि नियंत्रण केले जाणार आहे. यासाठी या केंद्रात मराठी भाषा अधिकारी यांचीही नियुक्ती करण्यात येणार आहे. या माध्यमातून मराठी भाषेच्या विकासाला अधिक गती मिळणार असल्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात उद्योग डॉ. उदय सामंत यांनी आज जिल्ह्यातील साहित्यिकांशी संवाद साधला. यावेळी आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार आनंदराव बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदिप गायकवाड, साहित्यिक श्रीकांत देशमुख, आदींसह ज्येष्ठ साहित्यिक, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. सामंत यांनी मराठी भाषा संवर्धन, जतन आणि जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर त्यांनी उपस्थित साहित्यिक, लेखक आणि मराठी भाषा अभ्यासकांशी मुक्त संवाद साधत मराठी भाषेच्या जतन, संवर्धन आणि प्रसाराबाबत त्यांच्या अपेक्षा, सूचना व मागण्या जाणून घेतल्या. साहित्यिकांनी मांडलेल्या सर्व सूचना आणि मागण्यांची शासन सकारात्मक दृष्टीने निश्चितच दखल घेईल. तसेच संबंधित प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही डॉ. सामंत यांनी यावेळी दिली.

ते म्हणाले की, मराठी भाषेला केंद्र शासनाकडून अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे ही मराठी भाषेसाठी ऐतिहासिक बाब ठरली आहे. मराठी भाषेला जागतिक स्तरावर कायमस्वरूपी अधिष्ठान मिळावे, या उद्देशाने लंडन येथे 'छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी भाषा केंद्रा'साठी भव्य इमारत खरेदी करण्यात आली आहे. या इमारतीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत पाच कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. या केंद्राच्या माध्यमातून मराठी भाषा शिक्षण, संशोधन, साहित्य प्रसार, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच जागतिक स्तरावरील मराठी उपक्रमांना नवे व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



याशिवाय, ऐरोली (नवी मुंबई) येथे मराठी भाषा विभागाचे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूखंड उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुंबई येथे उभारण्यात येणाऱ्या भव्य आणि आधुनिक मराठी भाषा भवनाचे कामही प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यात प्रत्येक विभागीय स्तरावर तसेच जिल्हास्तरावर मराठी भाषा विकास केंद्र स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. आगामी काळात मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार आणि प्रसार अधिक प्रभावीपणे करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असेही डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले. राज्यातील अमराठी नागरिकांनाही मराठी भाषा सहज शिकता यावी, यासाठी शासनाने विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत सुमारे ७० हजार अमराठी नागरिकांना मराठी भाषा विभागामार्फत मराठी शिकविण्यात यश आले आहे. याशिवाय, अमराठी भाषिकांना मराठी भाषा अधिक सुलभपणे शिकता यावी आणि अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठी मराठी भाषा विभागाच्यावतीने लवकरच मराठी भाषा शिकण्यासाठी मोबाईल ॲप विकसित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. शेवटी आभार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मानले.

# मराठी ही रोजगाराभिमुख भाषा-राम तरटे



नांदेड/प्रतिनिधी-मराठी भाषा ही केवळ साहित्यापुरती मर्यादित नसून पत्रकारिता, कथालेखन, संपादन, मुद्रितशोधन, अनुवाद, माध्यम क्षेत्र तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणारी भाषा आहे. त्यामुळे मराठी ही खऱ्या अर्थाने रोजगाराभिमुख भाषा असल्याचे प्रतिपादन पत्रकार तथा प्रसिद्ध कथाकार राम तरटे यांनी केले.

यशवंत महाविद्यालयाच्या मराठी विभागात आयोजित उद्बोधन वर्गात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्र-कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे होते. मार्गदर्शन करताना राम तरटे यांनी मराठी विषयातून उपलब्ध होणाऱ्या करिअरच्या विविध संधींचा सविस्तर आढावा घेतला. पत्रकारिता, कथालेखन, संपादन, मुद्रितशोधन, आशयलेखन, अनुवाद आणि माध्यम क्षेत्रात मराठी जाणकारांना मोठी संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षांमध्येही मराठी भाषा व साहित्याचा सखोल अभ्यास यशासाठी महत्त्वाचा ठरतो, असे नमूद करत विद्यार्थ्यांनी भाषिक कौशल्यासह लेखन, वाचन आणि अभिव्यक्ती क्षमता विकसित करण्याचे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे यांनी भारतीय शिक्षणव्यवस्थेत 'शिक्षण' आणि 'दीक्षा' या दोन्ही घटकांचे महत्त्व अधोरेखित केले. आधुनिक काळात विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान, बहुविद्याशाखीय अध्ययन आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयातील ग्रंथालय, डिजिटल सुविधा आणि ई-बुक्सचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनवावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठी विभागप्रमुख डॉ. संजय जगताप यांनी प्रास्ताविक केले. विभागाचा परिचय डॉ. विश्वधर देशमुख यांनी करून दिला. सूत्रसंचालन कु. प्रज्ञा इंगोले यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय कु. गोदावरी काननुकले यांनी करून दिला. आभार प्रदर्शन डॉ. शिवाजी सूर्यवंशी यांनी केले.

### 'बारा आण्याची बोंब' कथाकथनाने सभागृहात हास्यकल्लोळ

पत्रकार तथा कथाकार राम तरटे यांनी सादर केलेल्या 'बारा आण्याची बोंब' या विनोदी कथाकथनाने विद्यार्थी, प्राध्यापक आणि उपस्थित श्रोत्यांना अक्षरशः खळखळून हसवले. ग्रामीण जीवनातील खुसखुशीत प्रसंग, बिलोली परिसरातील अस्सल मराठी बोलीभाषेचा सहज वापर आणि प्रभावी निवेदनशैली यामुळे सभागृहात अनेकदा हास्याचे फवारे उडाले आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. मनोरंजनासोबतच सामाजिक वास्तवावर भाष्य करणाऱ्या या कथाकथनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# किनवटमध्ये अवैध रेती वाहतुकीवर प्रशासनाने कारवाई करावी



## शिवसेनेचे नगरसेवक प्रशांत कोरडे यांची मागणी

किनवट/प्रतिनिधी- किनवट शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ आणि गल्लीबोळातून सुसाट धावणाऱ्या अवैध रेती वाहतुकीवरील गाढवं, खेचरांनी आणि इतर वाहनांनी नागरिकांच्या जिवाताशी खेळ मांडलाय.अवैध रेती वाहतुकीवर तात्काळ व कायमस्वरूपी आळा घालण्यात यावा, अन्यथा शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्याच्या इशाऱ्याचे पत्र नगरपरिषदेचे नगरसेवक प्रशांत कोरडे यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले. आजपर्यंत सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नेतेगणांनी अवैध रेती व्यवसाय बंद करण्याविषयी तक्रारी आणि निवेदने दिली परंतु प्रशासनाला मुळीच घाम आलेला नसल्यामुळे याही पत्राला गांभीर्याने घेतीलच असे वाटत नाही.

उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेचे शहरप्रमुख तथा नगरसेवक प्रशांत कोरडे यांच्या शिष्टमंडळाने ५ ऑगस्ट रोजी स्थानिकचे सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांसह नांदेडचे जिल्हाधिकारी, किनवटच्या तहसीलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि किनवट पोलीसांना उपरोक्त आशयाच्या मागणीचे पत्र सादर केल्याचे प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे. शहरातील मुख्य रस्ते आणि गर्दीच्या ठिकाणी गाढव, खेचर व इतर माध्यमांतून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीरपणे रेतीची वाहतूक चालू असून, लोकांच्या वर्दळीतून सुसाट वेगाने धावतात त्यांच्या धक्क्याने महिला, लहान मुले, विद्यार्थी व नागरिकांना दुखापती झाल्या मात्र त्यावर आवर घातलेला नाही. अनेकदा या प्राण्यांमुळे अपघात घडून नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. तसेच, रस्त्यावर सांडणाऱ्या रेतीमुळे वाहने घसरून अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे.

किनवट नगरपरिषदेतील सत्ताधाऱ्यांना सत्तेतील नगरसेवक प्रशांत कोरडे यांनी गाढवं, खेचरांचा मुद्दा उपस्थित करून घरचाच आहेर दिला असून त्यांनी वास्तवतेला हात घातलाय. मोकाट जनावरांचा नगरपरिषद आतातरी कायमचा बंदोबस्त करतील काय? असा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न आहे. दिवसभर रेती वाहतूकीची कामे घेऊन रात्रीच्या वेळी गाढवे आणि खेचरे मुख्य रस्त्यांवर सोडतात मग त्यांना कोंडवाड्यात सुरक्षित स्थळी हलविण्याची जबाबदारी नगरपरिषदेची नव्हे का?, भररस्त्यात दुकानांसमोर रात्री दुर्गंधी पसरतात असा आरोप करण्यात आलाय तेव्हा स्वच्छता विभागाच्या घनकचरा व्यवस्थापनाचे कामगार काय करतात?, ही जनावरे शाळकरी मुलांच्या व नागरिकांच्या अंगावर धावून जातात. गाढवांचा उपद्रव लोकांना त्रासदायक ठरत असुन महिला व लहान मुलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवसेना शहरप्रमुख प्रशांत कोरडे, माजी शहरप्रमुख संतोष येलचलवार आणि शहर संघटक किशोर बोलेनवार यांनी संबंधितांना पत्रव्यवहार केलाय. नगरपरिषद प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी अनेकांची मागणी आहे.

# बलात्कार प्रकरणी तरुण तेजपाल दोषी

मुंबई/प्रतिनिधी- तेहलका मासिकाचे माजी मुख्य संपादक तरुण तेजपाल यांना बलात्कार आणि लैंगिक छळ प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने गुरुवारी दोषी ठरवले. म्हापसा सत्र न्यायालयाने दिलेला निर्दोष मुक्ततेचा निकाल रद्द करत उच्च न्यायालयाने गोवा सरकारचे अपील मंजूर केले. आता तेजपाल यांना सुनावण्यात येणाऱ्या शिक्षेच्या प्रमाणावर स्वतंत्र सुनावणी होणार आहे.


न्या.डॉ. नीला गोखले आणि न्यायमूर्ती अमित जामसंडेकर यांच्या खंडपीठाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ (२) (फ), ३७६ (२) (क), तसेच कलम ३५४-अ आणि ३५४-ब अंतर्गत तेजपाल यांना दोषी ठरवले. नोव्हेंबर २०१३ मध्ये तेहलकाच्या एका कनिष्ठ महिला सहकाऱ्याने त्यांच्याविरुद्ध लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल केली होती.निकालानंतर तेजपाल यांचे वकील आबाद पोंडा यांनी न्यायालयाकडे शिक्षेबाबत सौम्यता दाखविण्याची विनंती केली. हे प्रकरण १३ वर्षे जुने असून, निर्दोष मुक्ततेचा निकाल उलटविण्यात आला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यासाठी दोषसिद्धीच्या आदेशाला किमान आठ आठवड्यांची स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच तेजपाल यांच्याविरुद्ध अन्य कोणताही गुन्हा किंवा एफआयआर दाखल नसल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.



तरोडा भागातील ज्येष्ठ नागरिक विठ्ठलराव तुकारामजी देशमुख तरोडेकर यांचे नुकतेच निधन झाले. आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी देशमुख यांच्या निवासस्थानी भेट देवून कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी स्वप्नील इंगळे, बाळासाहेब देशमुख, रामराव देशमुख, बालासाहेब देशमुख, मोहसीनखान पठाण, शिवाजीराव देशमुख व इतर उपस्थित होते.

# अमेरिका ट्रेड डील शेतकऱ्यांसाठी घातक-राकेश टिकैत

नांदेड/प्रतिनिधी-भारत-अमेरिका प्रस्तावित ट्रेड डीलमुळे शेती, दुग्धव्यवसाय, पशुपालन, लघु व्यापारी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होणार असल्याचा आरोप भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकैत यांनी केला. या कराराविरोधात देशभर जनजागृती सुरू असून गरज पडल्यास पुन्हा व्यापक शेतकरी आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा त्यांनी नांदेड येथे एका कार्यक्रमात बोलतांना दिला आहे.



भारतीय किसान युनियनच्या वतीने आयोजित 'भारत-अमेरिका ट्रेड डील विरोधी जनजागृती मोहीम' आणि जिल्हा शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी टिकैत यांनी केंद्र सरकारच्या कृषी धोरणांवर टीका करत शेती आणि शेतजमिनी वाचविण्यासाठी तरुणांनीही मोठ्या प्रमाणात पुढे येण्याचे आवाहन केले. दिल्लीतील शेतकरी आंदोलनाप्रमाणेच आवश्यकता भासल्यास देशभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असे ते म्हणाले. नांदेडच्या ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाचा उल्लेख करत टिकैत म्हणाले की, देशभरातील शेतकरी येथे येत असल्याने भविष्यातील शेतकरी चळवळीचे नांदेड हे महत्त्वाचे केंद्र ठरू शकते. कार्यक्रमाला भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकैत, राष्ट्रीय महासचिव युद्धवीरसिंह, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष भाई चंद्रशेखर लगड, प्रदेश महासचिव रूपेश पाटील, जिल्हाध्यक्ष शिंदे, संतोष जाधव, जगजीत धनंजय कौशल, मनजूर डॉ. निनोज पाटील, कृष्णा हेमण्णा पाटील, परमेश्वर जाधव यांच्यासह विविध जिल्ह्यांतील शेतकरी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भारत-अमेरिका ट्रेड डीलविरोधात राज्यभर जनजागृती मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# वै.रामन्ना व नीलाबाई चिलवरवार यांच्या पुण्यस्मरणार्थ श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-स्वतः अशिक्षित, निरक्षर असून माझी मुलं शिकली पाहिजेत या भावनेतून अपार कष्ट, मेहनत करुन मुलांना शिक्षण देवून चिलवरवार परिवाराचे उद्धार करणाऱ्या वै.रामन्ना चिलवरवार व वै.नीलाबाई चिलवरवार (करडखेडकर) यांच्या पुण्यस्मरणार्थ श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कथा प्रवक्ते भागवताचार्य ह.भ.प. एकनाथ महाराज पाळेकर सद्गुरु श्री अंबादास महाराज संस्थान पाळा हे असून हा धार्मिक व आध्यात्मिक सोहळा दि.५ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ ते ५ पर्यंत व काल्याचे किर्तन १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १२ पर्यंत होईल. या कालावधीत संत ज्ञानेश्वर महाराज व हनुमान मंदिर, विणकर कॉलनी चौफाळा, नांदेड येथे संपन्न होणार आहे.

या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात भाविकांना भागवत कथेचे श्रवण, आध्यात्मिक मार्गदर्शन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेता येणार आहे. या निमित्ताने परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन धार्मिक सोहळ्याचे आयोजक लिंगुराम चिलवरवार, भूमन्ना चिलवरवार, विठ्ठल चिलवरवार, व्यंकट चिलवरवार यांच्यासह चिलवरवार परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# पृथ्वीराज तौर यांच्या विश्वकाव्याचा संस्कृती उत्सवचे ना.उदय सामंत यांच्या हस्ते प्रकाशन

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. पृथ्वीराज तौर यांनी अनुवादित केलेल्या विश्वकाव्याचा संस्कृती उत्सव या काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मराठी भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते एका कार्यक्रमात करण्यात आले.

यावेळी आ.बालाजी कल्याणकर, बाबुराव कोहळीकर, आनंदराव बोंढारकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, ज्येष्ठ नाटककार दत्ता भगत, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते श्रीकांत देशमुख, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष देविदास फुलारी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. विश्वकाव्याचा संस्कृती उत्सव या संग्रहामध्ये २५ देशांतील ३१ कवींच्या कवितांचे मराठी अनुवाद समाविष्ट आहेत. या संग्रहाचे संपादन पीपल्स कॉलेजच्या समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. स्वाती काटे यांनी केले आहे. या संग्रहाच्या माध्यमातून इजिप्त, मलेशिया, थायलंड, ब्रूनेई दारुस्सलाम, निकाराग्वा, मेक्सिको, इराण, स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, फिलिपिन्स, पॅलेस्टाईन आदी देशांतील समकालीन कवींच्या कविता प्रथमच मराठी वाचकांसाठी उपलब्ध झाल्या आहेत. डॉ. पृथ्वीराज तौर यांना वर्ल्ड ऑर्गनायझेशन ऑफ रायटर्स, मॉस्को (रशिया) या संस्थेचा सिल्व्हर मेडल तसेच नॅशनल रायटर्स असोसिएशन ऑफ साऊथ आफ्रिका या संस्थेचा साहित्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. या प्रकाशनानिमित्त साहित्यिक श्रीकांत देशमुख, देविदास फुलारी, दत्ता डांगे, निर्मलकुमार सूर्यवंशी, महेश मोरे, राम तरटे, श्रीनिवास मस्के, अमृत तेलंग यांच्यासह अनेक साहित्यिकांनी डॉ. पृथ्वीराज तौर यांचे अभिनंदन करून त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव केला.





## जाहीर प्रगटन

नांदेड येथील मा.सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे न्यायालय
(समक्ष एम.एस.बोराळे किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९९५/२०२६)

अर्जदार : १. अनजंनाबाई गोविंदराव निखाते, वय ६५ वर्ष धंदा घरकाम रा.वाघाळा ता.जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : १. सिडको प्रशासन
२. राहुल गोविंदराव निखाते, वय ४३ वर्षे धंदा मजुरी रा.वाघाळा ता.जि.नांदेड
३. माणिक गोविंदराव निखाते, वय ४१ वर्षे धंदा मजुरी रा.वाघाळा ता.जि.नांदेड
४. कपील गोविंदराव निखाते वय ३३ वर्ष धंदा मजुरी रा.वाघाळा ता.जि.नांदेड

दावा : भारतीय सक्सेशन कायदा २७८ प्रमाणे प्रशासकिय प्रमाणपत्र मिळणेबाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी प्रशासकिय प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला असून गैरअर्जदार क्र.१ सिडको प्रशासन असून गैरअर्जदार क्र.२ ते ४ हे त्यांचे मयताचा मुले असून अर्जदार याने प्रशासकिय प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला असून आहे. मयत गोविंदराव नामदेव निखाते यांचा मृत्यू दिनांक ७/८०/२०२३ रोजी झाला असून त्यांचे नावे असलेले सिडको येथील घर क्र. Tenannent no. ND-41/B3/3008ADM 34.71 SQ MTR-from the respondent NO 1on 16-01-2013 in that सिडको नवीन नांदेड याबाबतचे प्रशासकिय प्रमाणपत्र (प्रशासकिय) अर्जदार यांना मिळावे म्हणून त्यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे सक्सेसन प्रमाणपत्र देणेसाठी अर्ज दाखल केला आहे. तरी प्रशासकीय प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत दिनांक ०१/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे. अन्यथा आपणास या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदरील अर्जाचा कायदेशीर निकाल देण्यात येईल. प्रकरणात पुढील नेमलेली तारीख ०१/०९/२०२६ आहे.

आज दि.०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहायक अधिक्षक** |
| सह दि.न्या.व.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |


# आरक्षण उपवर्गीकरण निर्णया विरोधातील मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-अनुसूचित जातींच्या घटनात्मक आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या निर्णया विरोधात अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, नांदेड यांच्या वतीने रविवार, दि.९ ऑगस्ट रोजी विराट महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. आरक्षणातील विभाजनामुळे अनुसूचित जाती समाजात फूट पडण्याचा धोका निर्माण होईल, असा इशारा देत हा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी या महामोर्चातून करण्यात येणार आहे.

या महामोर्चासाठी विद्यार्थी नेते डॉ.हर्षवर्धन दवणे यांच्या आदेशानुसार नॅशनल एससी, एसटी, ओबीसी स्टुडंट अँड युथ फ्रंट (नसोसवायएफ) चे प्रवक्ते तसेच अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, नांदेडचे सदस्य सतीश वागरे आणि प्रकाश दिपके यांनी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, विद्यार्थी संघटना, संविधानप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, युवक-युवती आणि विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. अनुसूचित जातींच्या आरक्षणाची अखंडता अबाधित ठेवणे आणि समाजातील ऐक्य टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही, असा निर्धार अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, नांदेडने व्यक्त केला आहे.

# महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरट्यांनी पळविले

नांदेड/प्रतिनिधी-रस्त्याने जात असतांना एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र तीन चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना मंगळवारी सकाळी शहरातील महात्मा बसवेश्वर चौकात घडली आहे.

चित्राबाई कैलाशचंद पाटणी (वय ६५) रा.वाडी (बु.) नांदेड ह्या मंगळवार दि.४ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता पायी जात असतांना महात्मा बसवेश्वर चौकाजवळ पाठीमागून दुचाकीवर आलेल्या तीन आरोपींनी चित्राबाई पाटणी यांच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून घेवून तीन्ही चोरटे फरार झाले आहेत. चित्राबाई पाटणी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात अज्ञात तीन चोरट्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री.वाडेवाले हे करीत आहेत.

# रेती वाहतूक करणारा टिप्पर जप्त

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या रेती वाहतूक करणारा टिप्पर बुधवारी सकाळी उस्माननगर रोडवर पोलीसांनी जप्त केला आहे. टिप्पर क्र.एमएच २४ जे-६०६४ मध्ये रेती भरुन विक्रीसाठी घेवून जात असतांना बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ढवळे कॉर्नर ते उस्माननगर रोडवर नांदेड ग्रामीण पोलीसांनी पकडला आहे. पोलीसांनी टिप्पर व रेती असा ४ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.


## CHANGE IN NAME

My (old name) is **NILOFAR MOIN QURESHI** which now I am, changing as (new name) **NILOFAR BEGUM MOHAMMAD UMER QURESHI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address
9-5-688,Hamidiya Colony,Degloor Naka,
Nanded-431604
M No-9284828676


# महाविद्यालय हे केवळ शिक्षणाचे नव्हे,तर संस्कारांचेही केंद्र-डॉ.महेंद्रकुमार कुलकर्णी

नांदेड/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी महाविद्यालयीन शिक्षणासोबत विविध शैक्षणिक, बौद्धिक आणि कौशल्यविकास कार्यक्रमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपल्या ज्ञानात, कौशल्यात आणि व्यक्तिमत्त्वात सातत्याने भर घालावी. महाविद्यालय हे केवळ पदवी प्रदान करणारे केंद्र नसून सुसंस्कृत, जबाबदार आणि राष्ट्राभिमानी नागरिक घडविणारे संस्कारकेंद्र आहे, असे प्रतिपादन नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी यांनी केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथे आयोजित विद्यार्थी उद्बोधन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम, डॉ. मनीष देशपांडे, डॉ. जीवन म्हसुरे, डॉ. आशा मेश्राम आणि डॉ. गिरीश पांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, महाविद्यालयीन जीवन हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि संस्मरणीय टप्पा असतो. सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते. महाविद्यालयात मिळणारे शिक्षण, अनुभव आणि मैत्री आयुष्यभर साथ देणारी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या सुवर्णकाळाचा आनंद घेत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असा मौलिक संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर प्रमुख संसाधन व्यक्ती डॉ. आशा मेश्राम यांनी राष्ट्रीय सेवा योजना, मूल्याधिष्ठित शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि करिअर नियोजन या विषयांवर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. विजयकुमार मठपती यांनी केले, तर प्रा. के. जे. कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

